# ओंजळ

परमेश्वराने माणूस नावाची कलाकृती निर्माण केली आणि त्या कलाकृतीला कलासक्त आणि कलाकार बनवण्यासाठी दोन हात आणि पाच बोटं दिली. ह्या दहा बोटांनी आणि दोन हातांनी हा माणूस स्वतःचे भविष्य बनवतोच पण निरनिराळ्या कला जोपासतो आणि विविध कलांचा आविष्कार सादर करत असतो. ज्या दोन हातांनी आणि दहा बोटांनी सृजनशीलता जपली जाते आणि कलेचे विविध आविष्कार सादर केले जातात, तेच दोन हात आणि दहा बोटं एकत्र आल्यानंतर एक द्रोणासारखा किंबहुना त्यापेक्षा सुंदर आविष्कार सादर होतो तो म्हणजे 'ओंजळ'.

माणूस हा समाजशील प्राणी, एकमेकांची सुख दुःखं जाणणारा आणि एकमेकांना सुख दुःखात मदत करणारा. ती मदत करताना एका हाताने देत असताना दुसरा हात ती मदत स्वीकारत असतो. देणारा देत असतो आणि घेणारा घेत असतो. हे दातृत्व आणि त्याचा स्वीकार साधारणतः ओंजळीमार्फत केला जातो. 'ओंजळ' केली असता त्यात घेतलेला पदार्थ अथवा वस्तू सांडत नाही अशी सुंदर रचना ओंजळीची असते.

ओंजळ हे पुरेसे पण परिपूर्णतेच प्रतीक आहे जणू. खरं तर माणसाच्या पोटाला किती लागत याचा विचार केला तर तर ओंजळीत मावेल एवढं अन्न पुरेसं ठरतं, एका वेळेचं पोट भागवायला. कदाचित प्रत्येकाची ओंजळ देवांनी त्याच मापाने बनवली असेल जणू. तहान लागली तर ओंजळीभर पाण्याने तहान भागते. कोणी देवाचा प्रसाद दिला अथवा हातात ओंजळीभार खायला दिलं तर तेवढ्यात पोट भरते. प्रत्येकाचे ओंजळीने माप त्याची गरज भागवायला जणू पुरेसे असते.

दान देताना पण भरल्या ओंजळीने दिले जाते आणि दान घेतांना पण भरल्या ओंजळीत स्वीकारले जाते. ओंजळीने दिलेले दान आणि ओंजळीत स्वीकारलेले दोन्ही सत्पात्री मानतात. ओंजळ हे दान देणाऱ्यासाठी नम्रतेचे आणि दान घेणाऱ्यासाठी स्वाभिमानाचे प्रतीक आहे.

रस्त्यांनी चाललेला पथिक, रणरणत्या उन्हात जेव्हा त्याची तृष्णा भागवतो त्यावेळी ही हाताची ओंजळ जणू भांड्याचे काम करते. कोणत्याही पाणपोईवर पाणी पीत असताना हाताची ओंजळ केली की त्या जलस्त्रोताचे पावित्र्य टिकून राहते.

हातात घेतलेली वस्तू पडायची आणि सांडायची शक्यता जास्त असते. दोन्ही हात पसरून घेणे हे एक प्रकारच्या अगतिकतेच लक्षण मानले जाते. त्यामुळे सहज म्हटलं जातं, 'कोणापुढे हात पसरू नये'

परंतु ओंजळीच तसं नाही ओंजळीत स्वीकारलेली गोष्ट सांडत नाही, तिचे पावित्र्य राखले जाते त्यामुळे देवाचा प्रसाद, भिक्षा ही ओंजळीत स्वीकारली जाते. ओंजळीतून स्वीकारलेली गोष्टीत परिपूर्णता आणि सात्विकता असते.

सकाळी उठून आपण दोन्ही हात जोडून, 'कराग्रे वसते लक्ष्मी करमध्ये स्वरस्वती' हे ओंजळीकडे पहाताच म्हणतो. देवाला फुलं अर्पण करताना हाताच्या ओंजळीने फुलं अर्पित करतो. पारिजात, मोगरा इ. सुवासिक फुलं ओंजळीने भरून त्याचा मनसोक्त वास घेताना मन जणू त्या धुंद वासाचा आनंद घेतो आणि त्यानंतर रित्या झालेल्या ओंजळीत त्या फुलांचा परिमळ कायम राहतो.  ह्याच ओंजळीने सूर्यास अर्घ्य देताना सात्विक भाव अनुभवतो.

भा. रा. तांबे त्यांच्या  कवितेत लिहितात,
'मावळत्या दिनकारा
अर्घ्य तुज अर्पिते
जोडुनी दोन्ही करा'

लग्नात कन्यादानाच्या वेळी लज्जा होम करताना ओंजळीने त्या होमात साळीच्या लाह्या टाकतात, हा कन्यादानाचा एक भाग असतो. इतकं ओंजळीचं आणि दानाचं जवळचं नातं आहे.

ओंजळीत भरलेलं धान्य अथवा शिधा संन्याशाला अथवा वारकऱ्यांना देताना सात्विकतेची अनुभूती लाभते.

कधी कधी, ह्याच ओंजळीचा वापर लाजेने चूर झालेली नवविवाहित तरुणी, आपला लाजरा चेहरा लाडिकतेने झाकण्यासाठी करते.

श्रद्धा या शब्दावरून श्राद्ध शब्द रूढ झालाय. आपल्या मृत आप्तांसाठी श्राद्ध करताना पिंडदान करतात, त्याला तर्पण म्हणतात. तर्पण केल्याने त्यांच्या आत्म्याला शांती मिळते आणि आप्तांना सद्गती प्राप्त होते, ही श्रद्धा आहे. हा तर्पण विधीसुद्धा ओंजळीने केला जातो. ओंजळीने केलेले कार्य अथवा दिलेले दान सात्विक असते हीच त्यामागची भावना.

ओंजळ ही कधी रिती नसावी. ओंजळीत सदोदित काहीतरी माप असावे. दात्याच्या ओंजळीतून घेताना त्यात सात्विक भाव असतात. त्यामुळेच सढळ हाताने आणि परिपूर्ण ओंजळभरून  देणाऱ्याला कधी कमी पडत नाही. देणाऱ्याचीही ओंजळ कधी रिकामी पण राहत नाही. ह्याच ओंजळीच दान, त्या

व्यक्तीचं पुण्यसंचय करते आणि कधी अडचणीच्या वेळी ती रिक्त ओंजळ कधी भरले जाते, हे कळतही नाही कधी.

देणाऱ्याच्या आणि घेणाऱ्याच्या ओंजळीबाबत छान लिहिले आहे -
"सगळं तुला देऊन पुन्हा,
माझी ओंजळ भरलेली.
पाहिलं तर तू तूझी ओंजळ,
माझ्याच ओंजळीत धरलेली."

ओंजळ आणि दातृत्व ह्याबाबत रहीम ह्यांचा मोठा प्रसंग आहे. रहीम कृष्ण भक्त होते तसेच ते मोठे दानी होते पण त्याची एक खासियत होती, दान देतांना ते डोळे मिटून घेत, झुकलेल्या नजरेने दान करीत. त्यांचा हात दानासाठी जसा वरवर जात असे तसे त्यांचे डोळे मिटले जात. एकदा तुलसीदास यांनी त्यांना या खासियतेबाबत विचारले असता, रहीम यांनी उत्तर दिले, 'देणारा तो ईश्वर आहे. मी फक्त त्यामधला मध्यस्थ आहे, पण न जाणो कधी कुणाच्या रूपाने साक्षात नारायण समोर येऊ शकतात त्यामुळे माझी शरमेने मान खाली जाते. भक्त रहीम म्हणतात,
"देनहार कोई और है।
भेजक सिर्फ हूँ मै।
जो जो कर उंचों करे।
तो सो नीचे नैन।

अशी ही 'ओंजळ' देणाऱ्यासाठी दातृत्वाचं प्रतीक आहे. स्वीकारणाऱ्यासाठी जणू पावित्र्याचा स्वीकार आहे पण त्या सोबत कृतज्ञतेची जाणीव आणि जबाबदारी आहे. देणाऱ्याची 'ओंजळ' कधी रिती राहू नये ह्याची काळजी घेणाऱ्याने ठेवावी, कारण कधी काळी देणाऱ्याची 'ओंजळ' रिती झाली तर घेणाऱ्याने भरली 'ओंजळ' रित्या हातावर ठेवावी, जेणेकरून ही दातृत्वाची शृंखला कायम राहावी.
विंदा म्हणतात ना,
'देणाऱ्याने देत जावे
घेणाऱ्याने घेत जावे
घेता घेता एक दिवस
देणाऱ्याचे हात घ्यावे'

**- मनोज कुरुंभटी**